MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात




श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान येथील यात्रेचा समारोप महाराष्ट्रातील कुस्ती मैदान होऊन संपन्न झाला यावेळी देवस्थानचे अध्यक्ष दादासाहेब चितळे सर यांनी नवसाची कुस्ती लावून कुस्ती हंगामेला प्रारंभ केला यावेळी गावातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य पदाधिकारी उपस्थित होते
छायाचित्र सुरेश कांबळे आष्टी

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०२ अंक -१३७ शनिवार दि.०१ फेब्रुवारी २०२५ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रु । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-02 Issue -137 SATURDAY DT.01 FEBRUARY 2025 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# नामदेव शास्त्रींकडून धनंजय मुंडेंची पाठराखण

## पंकजा मुंडेंची पहिली प्रतिक्रिया, राजीनाम्यावरही भाष्य

जालना : सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरण, बीडमधील गुन्हेगारी आणि खंडणी प्रकरणावरुन राजकारण चांगलंच तापलं असून मंत्री धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. त्याच पार्श्वभूमीवर वाढता दबाव लक्षात घेऊन धनंजय मुंडेंनी भगवान गडावर जाऊन महंत नामदेव शास्त्रींची भेट घेऊन यासंदर्भात चर्चा केली.

तर, या भेटीनंतर दुसऱ्याच दिवशी नामदेव शास्त्रींनी धनंजय मुंडेंच्या समर्थनार्थ पत्रकार परिषद घेऊन धनंजय गुन्हेगार नाही हे मी १०० टक्के खात्रीने सांगतो असे त्यांनी म्हटले. तसेच, खून करणाऱ्या आरोपींच्या मानसिकतेचा विचार व्हावा, अशीही प्रतिक्रिया त्यांनी दिली होती. त्यावरुन, सोशल मिडिया व राजकीय वर्तुळातून नामदेव शास्त्रींवर टीकेची झोड उठली. तसेच, काहींनी पंकजा मुंडेंना व धनंजय मुंडेंना वेगळा न्याय का, असा सवालही उपस्थित केला होता. आता, नामदेव शास्त्रींची भूमिका आणि धनंजय मुंडेंची पाठराखण यासंदर्भात पंकजा मुंडेंनी प्रथमच प्रतिक्रिया दिली आहे.

नामदेव शास्त्रींनी धनंजय मुंडेंची पाठराखण केली असून त्यांच्या समर्थनार्थ भक्कपणे पाठिशी असल्याचंही त्यांनी म्हटलं. यासंदर्भात पंकजा मुंडेंना जालन्यातील पत्रकार परिषदेत प्रश्न विचारण्यात आला होता, त्यावर त्यांनी अधिकचं बोलणं टाळलं. ''त्यांची त्यांची भूमिका आहे, त्यावर मी भूमिका व्यक्त करण्याची आवश्यकता वाटत नाही, असे पंकजा मुंडेंनी म्हटलं. तर, धनंजय देशमुख हे भगवान गडावर जाणार आहेत, यावरही त्यांनी प्रतिक्रिया देताना, प्रत्येक व्यक्तीच्या भूमिकेवर व्यक्त होण्याने फक्त बातमी होते, बाकी काही नाही, असे म्हणत पंकजा मुंडेंनी नामदेव शास्त्रींच्या वक्तव्यावर आणि धनंजय मुंडेंची पाठराखण करण्यावर बोलणे टाळल्याचे दिसून आले.




### धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याचा दबाव कुठे आहे?


धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, मुख्यमंत्र्यांनी आणि उपमुख्यमंत्र्यांनी स्वतः विषय अजून तसा धनंजयकडे केला नाही. त्यामुळे मला कळत नाही, कुठे दबाव आहे. स्वतः अजित पवारांनी स्पष्ट सांगितलेलं आहे, त्यात संबंध आढळला तर आम्ही योग्य ती कारवाई करू. पण, संबंध नसेल तर अन्याय व्हायला नको, हा अजित दादांचा निर्णय आहे, असे म्हणत पंकजा मुंडेंनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याच्या मागणीवरही स्पष्टपणे भाष्य केलं.




### त्यांच्यावर मी व्यक्त होत नाही - पंकजा

मनसेचे प्रकाश महाजन यांनी दिवंगत नेते गोपीनाथ मुंडेंचा संदर्भ देत धनंजय मुंडेंवर टीका केली होती. त्यासंदर्भात पंकजा मुंडेंना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर, त्यांचे ते व्यक्त होतात, मी त्यांच्यावर कधी व्यक्त होत नाही, ते स्वतंत्र व्यक्तिमत्व आहेत, तसेच ते दुसऱ्या पक्षाचे नेते आहेत, असे म्हणत पंकजा मुंडेंनी प्रकाश महाजन यांच्या वक्तव्यावर अधिकचं बोलणं टाळलं



# एसपी नवनीत कॉवतानी महिन्यातच गुन्हेगारांना आळा घालत दोन टोळ्यांवर मोक्का

## अनेक कारवाया करत कोट्यावधींचा मुद्देमाल जप्त



बीड /प्रतिनिधी

येथील पोलीस अधीक्षक म्हणून नवनीत कॉवत यांनी पदभार घेतल्यापासून त्यांनी आपल्या कामाला सुरुवात केली. केवळ महिन्याभरात धडाकेबाज कामगिरी करीत अवैध धंदे आणि गुन्हेगारीला आळा

घालण्यासाठी कारवायांना सुरुवात केली. या कारवयाच्या माध्यमातून त्यांनी जिल्ह्यातील गुन्हेगारांना घाम फोडला असल्याचे दिसून येत असून, पोलीस चांगले काम करीत असल्याची भावना जनसामान्यांमध्ये निर्माण झाली आहे.

मस्साजोगचे सरपंच स्व. संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक बदलून नवनीत कॉवत यांच्याकडे बीडची सुत्रे देण्यात आली. यावेळी आंदोलन, पोलीसांकडे बघण्याचा बदललेला दृष्टीकोन यासह विविध

आव्हाने होती. पण नवनीत कॉवत यांनी आपल्या कामातून मात केली असून, पोलीस दलाला स्पष्ट आदेश देत काम करण्यास भाग पाडले आणि अवघ्या महिन्याभरात धडाकेबाज कामगिरी करीत. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी ६७१ गुन्हे दाखल तीन कोटी २५ लाखांचा मुद्देमाल जप्त करुन अवैध धंद्यांना लगाम लावला, दोन टोळ्यांना मोक्का लावून ५०९ प्रतिबंधात्मक कारवाया केल्या, जिल्ह्यातील ३१० जणांचे शस्त्र परवाने रद्द करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना पाठविला, वाहतूक शाखेमार्फत ७ हजार ८७६ केसेस करून ५४ लाख ८१ हजार ५५० रूपायांचा दंड वसूल केला. जिल्हावासियांच्या सुरक्षेसाठीही कडक उपाययोजना हाती घेत सर्व पोलीस अधिकाऱ्यांना नवीन मोबाईल सीम कार्ड दिले असल्याने जनतेला २४ तास अवैध धंद्यांविषयीची माहिती देता येणार आहे. तसेच कामकाजाचा फीडबॅक जाणून घेण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात क्युआरकोड सिस्टम कार्यन्वित केली जाणार, जिल्ह्यातील सर्वच पोलीस अधिकारी आणि अमलदारांच्या वार्षिक बदल्या कायद्याप्रमाणे होणार असल्याचा निर्णय घेतला. यामुळे गुन्हेगारांना घाम फोडण्यात अन् पोलिसांची प्रतिमा सुधारण्यात एसपी नवनीत कॉवत यांना यश आल्याचे दिसून येत असल्याने त्यांच्या कामाचे जिल्ह्यात कौतुक करण्यात येत आहे.



## लिंबागणेश बसस्थानकावरील साधना मेडिकल चोरट्यांनी फोडले

# चोरटे सीसीटीव्हीत कैद

लिंबागणेश : बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानकस्थित एकनाथ तागड यांच्या मालकीचे साधना मेडिकल अँड जनरल स्टोअर्स आज दि.०१ शनिवार रोजी पहाटे ४ वाजता चोरट्यांनी फोडल्याचे आढळून आले. दुकानात असलेल्या सीसीटीव्हीत चोरटे कैद झाले असुन मेडिकल स्टोअर्स वरील मराठवाडा ग्रामीण बँक येथील सीसीटीव्ही कॅमेरे फोडण्यात आले आहेत. संबंधित प्रकरणी नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनि चंद्रकांत गोसावी यांना फोनवरून कल्पना दिली आहे.

साधना मेडिकल स्टोअर्सचे मालक एकनाथ तागड यांच्या म्हणण्यानुसार ते रात्री २ वाजता ज्वारी ,गहु भिजण्यासाठी रानात गेले होते. सकाळी ६ वाजता त्यांना त्यांचे दुकान फोडले असल्याचा फोन आला. दुकानात येऊन सीसीटीव्हीत पाहिले असता पहाटे ४ वाजता ३ जण तोंडावर रूमाल बांधुन कटर,टांबी ईतर साहित्याच्या सहाय्याने शटरचे दोन्ही कुलुप तोडून आत शिरून गल्ल्यातील पैसे काढून घेत असल्याचे दिसत आहे. एकनाथ तागड यांच्या म्हणण्यानुसार गल्ल्यातील ५००० रूपये चोरट्यांनी लंपास केले.नेकनुर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, पोलिस नाईक राऊत, लिंबागणेश पोलिस चौकीचे पो.हे.संतोष राऊत, नवनाथ मुंडे यांनी घटनास्थळी भेट देऊन स्थळ पंचनामा केला.

## प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण साठी नवीन उद्दीष्ट प्राप्त

**बीड मतदारसंघातील पात्र कुटुंबांनी लाभ घेण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन**

बीड (प्रतिनिधी)

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेसाठी नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले असून बीड तालुक्यासाठी तब्बल ५०१८ तर शिरूर कासार तालुक्यासाठी ३४९९ घरकुलांचे नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे बीड मतदारसंघातील निकषपात्र कुटुंबांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

स्वतःचे पक्के घर नसलेल्या कुटूंबांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घर बांधण्यासाठी अनुदान देण्यात येते. यावेळेस बीड मतदारसंघातील बीड व शिरूर कासार तालुक्यासाठी भरघोस उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे जास्तीत पात्र ठरलेल्या व यादीत नाव आलेल्या कुटुंबांनी आपले प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह ग्रामपंचायत मार्फत दाखल करून या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे. तसेच घरकुल प्रक्रिया पारदर्शक व्हावी व नागरिकांना यासंदर्भात कसल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याबाबत काळजी घेण्याच्या सूचनाही आ.क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

आर्थिक मागणी झाल्यास संपर्क करा



प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) या योजनेच्या कोणत्याही टप्प्यावर आर्थिक मागणी झाल्यास ९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

## शाम कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा.मनोहर गायकवाड यांची सेवानिवृत्ती




बीड (प्रतिनिधी लोकदिशा न्यूज)

आज दि ३१/०१/२५ रोजी शाम गदळे कनिष्ठ महाविद्यालयचे प्राध्यापक मनोहर गायकवाड यांचा सेवा निवृथी कार्यक्रम शाम कनिष्ठ महाविद्यालय दहिफळ वडमाऊली येथे संपन्न झाला त्या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शरद बप्पा गदळे सचिव वडमाऊली विद्या प्रसारक मंडळ तसेच आयोजक मुख्याध्यापक इप्पर / गदळे मॅडम यांनी प्रा. मनोहर गायकवाड यांचा सपतनिक सत्कार केला. प्रा. मनोहर गायकवाड यांनी शाम कनिष्ठ महाविद्यालय येथे ३१ वर्ष सेवा झाली. प्रा. मनोहर गायकवाड हे मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून सेवा दिली. त्यांनीं उत्कृष्ट अशे विध्यार्थी शाम कनिष्ठ महाविद्यालयातून घडवले त्यांचे मूळ गाव दहिफळ वाडमाउली याच गावात त्यांनी सेवा दिली त्याबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला कार्यक्रमाला उपस्थित प्रा गंदगे सर, प्रा. पी. पी. मुडे, प्रा. जे. जे. ठोंबरे, प्रा. गपाट सर, प्रा. सोळंके सर व शाम कनिष्ठ महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, शिक्षक, व इतर कर्मचारी उपस्थित होते



## मुख्यध्यापक सखाराम ससाणे यांचा सेवापूर्ती कार्यक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न!

आष्टी तालुक्यातील मौजे वाकी येथील सखाराम ससाणे हे शेतकरी प्रसारक मंडळ आष्टी या संस्थेच्या रोडेश्वर विद्यालय डोंगरगण येथून मुख्याध्यापक या पदावरून आज सेवानिवृत्त झाले त्यांच्या सेवापुर्ती कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या वतीने करण्यात आले होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभय धोंडे हे होते तर या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे ससाणे सरांचे शिक्षक मुरकुटे गुरुजी,डी. बी.राऊत सर, सरपंच माऊली वाघ,उपसरपंच परमेश्वर कर्डीले,रिपाई तालुकाध्यक्ष अशोक साळवे,ऍड. रत्नकांत निकाळजे,राजेंद्र लाड सर बौद्ध महासभा जिल्हा अध्यक्ष महालिंग निकाळजे,संस्कार उपाअध्यक्ष वामन निकाळजे,राजगुरू साहेब,बौद्ध महासभेचे केंद्रीय शिक्षक संतोष गजघाट सर,अशोक निकाळजे,राजकुमार मोरे सर,प्रा. जि. टी. कांबळे सर,अशोक लटपटे सर ,मुख्याध्यापक भीमराव आहेर सर, सुवर्त गव्हाळे सर, प्रा. मल्हारी जाधव सर, समता सैनिक दलाचे युवराज निकाळजे,आर. आर. निकाळजे सर सह त्यांचे सहकारी शिक्षक, पालक, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## जाती तोडा समाज जोडा हा वारकरी सांप्रदायाचा मूलमंत्र जपणे काळाची गरज-जयदत्त क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी)

आजच्या कलोशीत झालेल्या समाज मनाला एकत्रित करण्याचे काम पारंपारिक काळापासून वारकरी संप्रदायाने केले आहे जातीपातीला थारा न देता सर्व समाज बांधवांना एकाच छत्र छायेखाली आणण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले आहे ।।ज्ञानदेवे रचिला पाया, उभारिले देवालया, नामा तयाचा किंकर, त्याने रचिले हे आवर, मा उक्तीप्रमाणे संत ज्ञानेश्वरांनी उभा केलेल्या वारकरी संप्रदायाचा विस्तार संत नामदेव महाराज, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज, संत चोखामेळा, संत जनाबाई आदी संतांनी केला आहे, जाती तोडा समाज जोडा हा वारकरी सांप्रदायाचा मूळ मंत्र जपणे हीच आता काळाची गरज असल्याचे




प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे धर्मनाथ बीज निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह मध्ये ह.भ.प.अक्रूर महाराज साखरे यांचे काल्याचे किर्तन प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी उपस्थित राहून मठाधिपती ह.भ.प.शांतीब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले, यावेळी उपस्थित भाविकांना संबोधित करताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, गोरक्षनाथ टेकडीच्या विकासासाठी आपण कटीबद्ध असून आतापर्यंत ९ कोटींची कामे झाली असून मेणार्या काळात रस्ता, फरशी आणि कंपाउंड कामासाठी आपण प्रयत्न करणार आहोत, आजच्या काळात संत महतांच्या विचाराप्रमाणे वागण्याची गरज असून संतांच्या कार्यामुळे लोहचुंबकाप्रमाणे माणसे एकत्रित करण्याचे महत्त्वपूर्ण काम होऊ लागले आहे. या गडाच्या विकासासाठी सत्ता असो अथवा नसो आपण सतत प्रयत्नशील असून जाणीवपूर्वक विकास कामे करण्यावर आपण भर दिलेला आहे. गडाच्या भक्तांकडून वारंवार होणार्या मागणीचा विचार करून यासाठी आपण प्रमत्न करत असतो मनात भाव ठेवून कुठलेही भक्ती करा गोरक्षनाथ टेकडीचा भाविक-भक्त मोठ्या प्रमाणात आहे. वैकुंठवासी किसन बाबा मांनी अखंडपणे सुरू केलेली ही परंपरा मठाधिपती नवनाथ बाबा यांनी कायम

# बीडमध्ये ४ फेब्रुवारीला ठेवीदारांचा जनआक्रोश मोर्चा : प्रा.सचिन उबाळे

## ठेवीदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

ज्ञानराधासह इतर सर्व पतसंस्था, मल्टिस्टेट दिवाळखोरीत निघून दीड वर्षांचा कालावधी लोटला तरी पोलिस प्रशासनाला फरार असलेल्या अध्यक्ष व संचालक मंडळांना अटक पकडण्यात समाधानकारक यश आले नाही. परिणामी ठेवीदारांचा आक्रोश दिवसेंदिवस वाढत आहे. दरम्यान बीडमध्ये ४ फेब्रुवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर जिल्ह्यातील ठेवीदारांचा जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार असून मोर्चात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ठेवीदार संघर्ष कृती समिती महाराष्ट्र राज्य मुख्य प्रवर्तक तथा स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.सचिन भैय्या उबाळे यांनी केले आहे.

जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट, राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा




अर्बन (माजलगाव)आर्थिक दिवाळखोरीत निघालेल्या आहेत. यामध्ये मराठवाड्यातील लाखों ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. या ठेवी परत मिळाव्यात म्हणून स्वाभिमान संघटनेचे जिल्हाध्यक्ष तथा ठेवीदार संघर्ष कृती समितीचे मुख्य प्रवर्तक प्रा.सचिन उबाळे यांनी ठेवीदारांचा प्रश्न लावून धरला असून उपोषणासह मोठे आंदोलनही केले आहे. याची दखल घेत पोलिस प्रशासनाने ज्ञानराधाचे अध्यक्ष सुरेश कुटे यांना अटक केली. सर्वच पतसंस्थांवर राज्यभरात काही प्रमाणात गुन्हे दाखल झाले. मात्र कुटे ग्रुप च्या अर्चना कुटे,राजस्थानी मल्टीस्टेट,साईराम,जिजाऊ मल्टीस्टेट तसेच पतसंस्थांचे संचालक मंडळ अजुनही फरार आहे. आता ठेवीदारांना नूतन पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याडून अपेक्षा आहे. या प्रकरणाला दीड वर्षांचा कालावधी लोटला तरी पोलिसांकडून अद्यापही योग्य तपास लागला नाही. या काळात अनेकांनी आर्थिक समस्येला वैतागून आत्महत्या केल्या आहेत तर अनेकजण या धक्क्यातून अजुनही सावरले नाहीत. यामुळे बीडमध्ये ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता ठेवीदारांच्या जनआक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे. सकाळी ११ वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पाहार घालून मोर्चाला सुरुवात होईल. यानंतर माळीवेस, साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे

## नगर धामणगाव अमळनेर बीड रस्त्यावरील खड्डे थातुरमातुर बुजवले

**खड्डे बुजवल्यानंतर काही महिन्यातच पुन्हा त्याच जागी खड्डे**

सुरेश कांबळे

आष्टी प्रतिनिधी. नगर धामणगाव अमळनेर महाराष्ट्र राज्य रस्ता क्रमांक २२२ नगर दौलावडगाव बीड महामार्ग प्रवासासाठी अत्यंत धोकादायक बनला असून महामार्गालगत राहणाऱ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे हा महामार्ग अत्यंत दुरवस्था झाली असून सार्वजनिक बांधकामाला वारंवार सांगून उपयोजना करण्यात येत नाहीत त्यामुळे अपघातामध्ये अनेकांची बळी जात आहेत महामार्गावर अनेक ठिकाणी धोकादायक खड्डे पडले असून हे खड्डे बुजवण्याचे काम राजकमल कंट्रक्शन कंपनी कडून काही महिन्यापूर्वी केले होते परंतु फक्त नावालाच मलमपट्टी करून या ठेकेदाराने हे खड्डे बुजवण्याचे काम केले अधिकारी व ठेकेदार यांचे संगणमत असल्याने असे कामे या रस्त्यावर वारंवार होत आहेत मात्र याकडे वरिष्ठ अधिकारी कसलेच लक्ष द्यायला



तयार नाहीत पूर्वी थत्तूर मात्र पद्धतीने खड्डे बुजवण्यात आले आहेत खड्डे बुजवलल्यानंतर काही महिन्यातच पुन्हा याच जागी खड्डे पडत असल्याचा आरोप देखील नागरिकांकडून करण्यात येत आहे या खड्ड्यामुळे सतत लहान मोठे अपघात होत असतात महामार्ग ठीक ठिकाणी पडलेली खड्डे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे झालेले दुर्लक्ष त्यामुळे अपघाताय संख्या वाढत असल्याचा आरोप ही नागरिकांकडून होत आहे

# बीड तालुक्यात एनडीआरएफ पथकामार्फत बिंदुसरा तलावात प्रशिक्षण व जनजागृती

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिलेल्या माहितीनुसार बीड तालुक्यातील पाली जवळील बिंदुसरा तलावात एनडीआरएफ च्या १६ जणांच्या पथकामार्फत शुक्रवार दि ३१ जानेवारी रोजी शालेय विद्यार्थी , नागरिक यांना नैसर्गिक आपत्तीत कशाप्रकारे स्वतःचा बचाव करावा , इतरांस सहाय्य करावे याबाबत प्रशिक्षण देण्यात आले . यावेळी विविध शासकीय अधिकारी , कर्मचारी , पोलीस विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते .

किशोर जाधव यांच्या नेतृत्वाखाली राजू प्रसाद , गवळी संतोष , संतोष शिंदे , दानवे अनिल , पाटील अनिल , मोरे किशोर राम , पवार विशाल , खवारे किरण , जायभाय शिवम , नीता कुंडेकर , बागुल विनेश , मोरे अमोल , गायकवाड सुनील , सय्यद मुनीर , भालेराव गणेश या एनडीआरएफ टीम मधील अधिकारी व कर्मचारी यांनी मौजे पाली येथील बिंदुसरा डॅम येथे प्रात्यक्षिक करून दिले .राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या पुढाकारातून जिल्हाभर नागरिकांना , विद्यार्थ्यांना शासकीय अधिकारी , कर्मचाऱ्यांना नैसर्गिक आपत्तीचे वेळी कशाप्रकारे आपत्तीग्रस्तांना मदत करावी स्वतःच्या जीवाची काळजी घेत इतरांना कशी मदत करावी याबाबतचे प्रशिक्षण देण्याची योजना विचाराधीन होती .

निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी जिल्ह्यातील बिंदुसरासारखी धरणे तलाव याची माहिती घेतली . त्यानुसार एनडीआरएफची टीम सर्वत्र जाऊन जनतेला व शासकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे कार्यक्रम राबवित आहे . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या माध्यमातून बीड , गेवराई व शिरूर तालुक्यात अशी प्रशिक्षणे आयोजित करण्यात आलेली आहेत .

पावसाळ्यात अनेक ठिकाणी धो धो पाऊस बरसतो . यामुळं संपूर्ण जनजीवन विस्कळीत होत . अशा वेळी पूरस्थितीतून नागरिकांची सुटका करण्यासाठी प्रथम धावून येतं ते एन डी आर एफ च पथक . भूकंप , महापूर , त्सुनामी , चक्रीवादळ आणि इतर नैसर्गिक आपत्तीवेळी एन डी आर एफ दलाला पाचारण केलं जात . एन डी आर एफ ( नॅशनल डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स ) म्हणजेचं राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल .

एन डी आर एफ म्हणजे काय ?

अनेकदा पूरस्थितीत , भूकंप किंवा चक्रीवादळ अशा स्थितीत नागरिकांच्या मदतीला एन डी आर एफ चे जवान येतात . या दलाचे जवान पूर किंवा आपत्तीने ग्रस्त असलेल्या ठिकाणच्या नागरिकांचे प्राण वाचवतात . तुम्हाला प्रश्न पडला असेल की एन डी आर एफ म्हणजे नेमकं काय ? एन डी आर एफचे पूर्ण नाव हे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आहे . एनडीआरएफ ही एक



अशी शक्ती आहे की , जी नैसर्गिक आपत्ती असताना काम करते . यासाठी भूकंप , पूर यासारख्या परिस्थितीत , एनडीआरएफ फोर्सची एक टीम तयार केली जाते . संकटात सापडलेल्या नागरिकांच्या मदतीसाठी या टीमला पाठवलं जात . यात तीन बीएसएफ , दोन सीआरपीएफ , दोन सीआयएसएफ , दोन आयटीबीपी आणि दोन एसएसबी जवानांचा समावेश असतो .



जिथे जिथे कोणत्याही प्रकारची नैसर्गिक आपत्ती येते तिथे ही टीम अडकलेल्या लोकांसाठी मदत कार्य करते . एन डी आर एफ हे १२ बटालियनचे एक दल आहे .दरवर्षी मुसळधार पावसामुळं अनेक ठिकाणी पूर येतो . यावेळी एन डी आर एफ कामाला येते . यात तीन सीमा सुरक्षा दल , तीन केंद्रीय राखीव पोलीस दल , दोन केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल , दोन इंडो-तिबेट सीमा पोलीस , दोन सशस्त्र सीमा बल आणि एक आसाम रायफल्स . प्रत्येक बटालियनची एकूण संख्या अंदाजे १ हजार १४९ आहे . प्रत्येक बटालियनमध्ये इंजिनीअर , तंत्रज्ञ , इलेक्ट्रिशियन , श्वान पथक आणि वैद्यकीय / पॅरामेडिक्ससह असे प्रत्येकी ४७ जवान असतात .

कधी झाली एन डी आर एफ फोर्सची स्थापना ?

आपत्ती व्यवस्थापन कायदा , २००५ अंतर्गत धोकादायक आपत्ती परिस्थितीला विशेष प्रतिसाद देण्याच्या उद्देशाने २००६ मध्ये राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची स्थापना करण्यात आली . एन डी आर एफ हे केंद्रीय गृह मंत्रालयाच्या आखत्यारित येते . एनडीआरएफ फोर्स ही १६ बटालियनची एक फौज आहे . जी पॅरा-मिलिटरी लाइनवर आधारीत आहे . भारताच्या निमलष्करी दलांकडून प्रतिनियुक्तीवर व्यक्तींनी तयार केली जाते . एन डी आर एफ चे घोषवाक्य हे 'आपदा सेवा सदैव' असे आहे . या घोषवाक्याचा अर्थ आपत्तीच्या वेळी सदैव सेवा हीच प्राथमिकता असा होतो . पियुष आनंद हे देशपातळीवर महासंचालक आहेत . संतोष बहादूरसिंग हे महाराष्ट्र एन डी आर एफचे ( कमांडंट ) प्रमुख आहेत .

महाराष्ट्र आणि गोवा ही राज्य पाचव्या बटालियनच्या कार्यक्षेत्रात येतात . यामध्ये एकूण १८ तुकड्या आहेत . यापैकी मुंबईत ३ , पुण्यात १४ तर नागपूरमध्ये १ तुकडी आहे .

एन डी आर एफ मध्ये कसे जावे ?

एनडीआरएफमध्ये दाखल होण्यासाठी बीएसएफ , सीआरपीएफ , सिआयएसएफ , आयटीबीपी आणि एसएसबी यांसारख्या पॅरामिलिटरीचे जवान असणे आवश्यक आहे . कारण प्रतिनियुक्तीच्या माध्यमातून जवानांची नियुक्ती केली जाते . प्रतिनियुक्तीचा कालावधी सात ते नऊ वर्षं इतका असू शकतो . जवानांना १९ आठवड्यांचे आंतरराष्ट्रीय स्तराचं प्रशिक्षण दिलं जातं .

एन डी आर एफ : प्रशिक्षण

आपत्ती व्यवस्थापनाच्या मूलभूत गोष्टींमध्ये आधी राज्य पोलीस कर्मचार्यांना प्रशिक्षित केले जाते . दुसरे म्हणजे , राज्य आपत्ती प्रतिसाद म्हणून त्यांच्या राज्य सशस्त्र पोलीस तुकड्यांमधून किमान एका बटालियनला प्रशिक्षित केले जाते . तसेच एन डी आर एफ च्या धर्तीवर फोर्स एन डी आर एफ दल कार्यरत असते . पोलिस कर्मचार्यांव्यतिरिक्त , अग्निशमन सेवा , गृहरक्षक दल आणि नागरी संरक्षण यांच्या विद्यमान संसाधनांमधून एन डी आर एफची स्थापना केली जाते .

देशात १३ ठिकाणी ठिकाणी तैनात करण्यात आलेल्या बटालियनच्या टीम पुढीलप्रमाणे आहेत .

१) बीएन एनडीआरएफ , गुवाहाटी , आसाम - बीएसएफ
२) बीएन एनडीआरएफ , नदिया, पश्चिम बंगाल - बीएसएफ
३) बीएन एनडीआरएफ , कटक ओडिशा - सीआईएसएफ
४) बीएन एनडीआरएफ , वेल्लोर , तामिळनाडू- सीआईएसएफ
५) बीएन एनडीआरएफ , पुणे , महाराष्ट्र - सीआरपीएफ
६) बीएन एनडीआरएफ , वडोदरा , गुजरात - सीआरपीएफ
७) बीएन एनडीआरएफ , गाजियाबाद , उत्तर प्रदेश - आईटीबीपी
८) बीएन एनडीआरएफ , भटिंडा, पंजाब - आईटीबीपी
९) बीएन एनडीआरएफ , पटना, बिहार - बीएसएफ
१०) बीएन एनडीआरएफ , गुंटूर , आंध्र प्रदेश - सीआरपीएफ
११) बीएन एनडीआरएफ , वाराणसी, उत्तर प्रदेश - एसएसबी
१२) बीएन एनडीआरएफ , ईटानगर , अरुणाचल प्रदेश - एसएसबी
१३) बीएन एनडीआरएफ , जम्मू आणि काश्मिर - आसाम रायफल

मागच्या काही वर्षातील एनडीआरएफच्या प्रमुख कारवाया ( ऑपरेशन ) पुढीलप्रमाणे आहेत .

२०१५ मध्ये एप्रिल महिन्यात नेपाळ आणि भारताच्या काही भागात भूंकप झाला होता . त्यावेळी एनडीआरएफच्या टीम भारत आणि नेपाळच्या काही भागांमध्ये गेल्या होत्या . नोव्हेंबर २०१५ मध्ये चेन्नई आणि तामिळनाडूमध्ये काही भागात पूर आला होता . त्यावेळी तेथील हजारो नागरिकांना वाचवण्याचे काम एन डी आर एफ च्या जवानांनी केलं होते .

केरळमध्ये ऑगस्ट २०१८ मध्ये आलेल्या पुराच्या वेळी एन डी आर एफ च्या ५८ तुकड्यांची नियुक्ती करण्यात आली होती . एका राज्यात एन डी आर एफ ची उभारणी झाल्यापासून आतापर्यंतची सर्वाधिक तैनाती होती . यावेळी १९४ लोकांचा जीव वाचवण्यात एन डी आर एफ ला यश मिळालं होत . दहा हजारहून अधिक लोकांना बाहेर काढण्यात आले होते .

२०२० साली आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम इथे गॅस गळतीची घटना घडली होती . ७ मे २०२० ला ही घटना घडली होती . यावेळी देखील एन डी आर एफ ची भूमिका महत्वाची होती . याच वर्षी पश्चिम बंगालमध्ये अम्फान चक्रीवादळ आले होते . या वादळातून देखील हजारो लोकांना वाचवण्याचे काम एन डी आर एफ च्या जवानांनी केलं आहे .

२०२१ साली उत्तराखंडमध्ये हिमनद्यांचा उद्रेक झाला होता . त्यावेळी तिथे पूर आला होता . ही घटना ७ फेब्रुवारी २०२१ मध्ये घडली होती . यावेळी एन डी आर एफ च्या जवानांनी हजारो लोकांना बाहेर काढले होते . तसेच ओडिशा आणि पश्चिम बंगालमध्ये यास चक्रीवादळ आलं होतं . यावेळी देखील एन डी आर एफ च्या जवानांनी मोलाची कामगिरी बजावली .


बिंदुसरा जलाशयात शुक्रवारी एनडीआरएफच्या पथकाने विविध प्रात्यक्षिके करून दाखविली . शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . यावेळी शितल चाटे मंडळ अधिकारी विभाग पाली , अनिल गायकवाड ग्राम महसूल अधिकारी पाली , जितेंद्र शेळके ग्राम महसूल अधिकारी आहेरवडगाव , संदीप नवले सरपंच पाली , मनीषा मुंडे शिक्षिका जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली , अंबादास गुजर सरपंच मंजरी हवेली , आनंद मस्के ग्रामीण पोलीस स्टेशनचे कर्मचारी , योगेश निर्धार पोलीस कर्मचारी हे उपस्थित होते .कोणत्याही नैसर्गिक आपत्तीच्या वेळी जिल्हा प्रशासन व तालुका प्रशासन सज्ज आहे .

# पोलिस दलातून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सन्मान : एसपींना नवनीत कॉवताचा पुढाकार

## फेटा बांधून सत्कार अन् बँड वाजवून निरोप दिला

**बीड /प्रतिनिधी**

**महाराष्ट्र आरंभ - बीड जिल्ह्यामध्ये सध्या पोलीस प्रशासनाला मोठी कसरत करावी लागत आहे बीड जिल्ह्यामध्ये या पाच वर्षांमध्ये अनेक घडामोडी घडल्या यामध्ये मराठा आंदोलन असेल दंगल असेल व बीडच्या जिल्ह्यातील कानाकोपऱ्यामध्ये कोणतीही घटना असेल पोलिसांना रात्रंदिवस २४ तास डोळ्यांमध्ये होतो काम करावे लागत होतं हे काम करत असताना अनेक संकटांना पोलिसांनी सामोरे गेले आणि आता पोलीस सेवेतून शासन नियमाप्रमाणे निवृत्त होत असताना विद्यमान एस पी नवनीत कावत यांनी वेगळा उपक्रम राबवला आहे असताना पोलीस बांधवांना**



फेटा बांधून कुटुंबियांसह सत्कार, भेटवस्तू आणि कार्यालयाच्या बाहेर पडताना पोलिस बँड वाजवून दिलेला मान. जिल्हा पोलिस दलातून निवृत्त होणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा अशा प्रकारे अनोखा सन्मान पहिल्यांदाच करण्यात आला. एसपी नवनीत कॉंवत यांच्या पुढाकारातून हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. कॉंवत यांनी आता दर महिन्याला निवृत्त होणाऱ्या जिल्हा पोलिस दलातील सर्व कर्मचाऱ्यांचा एसपी कार्यालयात एकत्रित सत्कार करण्याचा उपक्रम सुरु केला आहे. निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सहकुटुंब एसपी कार्यालयात निमंत्रीत केले जात आहे. कर्मचाऱ्यांना फेटा बांधून व भेटवस्तू देऊन गौरव केला जात आहे. विशेष म्हणजे, कार्यक्रम झाल्यानंतर कार्यालयातून घरी जात असताना या कर्मचाऱ्यांच्या सन्मानासाठी पोलिस बँड वाजवला जात आहे.शुक्रवारी श्रेणी पोलिस उपनिरीक्षक सुरेश वाघमारे, सहायक फौजदार परमेश्वर खिंडकर, सहायक फौजदार बालाजी मुंडे, श्रेणी पोलिस उपनिरीक्षक रमेश उबाळे आणि पोलिस नाईक अंगद जावळे हे सेवानिवृत्त झाले.केलेल्या कामांची पावती मिळाल्याच्या व्यक्त केल्या भावना निवृत्त पोलिस कर्मचाऱ्यांचा पोलिस अधिक्षकांनी सत्कार केला.

कर्मचाऱ्यांचे डोळे पानावले

पोलिस म्हणून काम करताना अनेकदा कामाची दखल घेतली जात नाही केवळ नकारात्मक नजरेने पाहिले जाते. बँड वाजवून निरोप देत झालेल्या सन्मानामुळे कर्मचाऱ्यांचे डोळे पानावले होते.

कर्मचाऱ्यांनी केलेल्या सेवेचा सन्मान

पोलिस कर्मचारी हा निवृत्तीपर्यंत पोलिस दलाचे काम करत असतो. त्याने नोकरीसाठी अनेकदा कुटुंबियांकडे दूर्लक्ष केलेले असते. सेवेच्चा सन्मान व्हावा यासाठी हा उपक्रम राबवला. नवनीत कॉंवत, पोलिस अधीक्षक,




# कडा येथील किराणा व्यापारी संघटनेचे पाच वर्ष पुर्ण

कडा (प्रतिनिधी) कडा येथिल किराणा दुकानदार व्यापारी संघटनेचे पाच वर्षं पुर्ण झाले या निमित्ताने कडा येथे कार्यक्रम संपन्न झाला. हा कार्यक्रम रतिलाल कटारीया यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.यावेळी संघटनेचे अध्यक्ष नागेश तात्या कर्डिले म्हणाले की हि संघटना सुरू करून आज पाच वर्षं पुर्ण झाले आहे. या संघटनेच्या एकीमुळे व्यापाऱ्यांना येणाऱ्या अडचणी दुर करणे, सामाजिक कार्य करणे सोपे झाले आहेत.कोरोना काळात संघटने मार्फत गरीब गरजू कुटुंबांना किराणा किट वाटप केले होते.या संघटनेच्या माध्यमातून आपण आजपर्यंत जसे सामाजिक कार्य करत आलो तसेच सामाजिक कार्य यापुढेही कायम करण्यात येणार आहे त्यामुळे आपण जी साथ आजपर्यंत दिली तशीच या पुढे ही द्यावी असे म्हणत उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमात जेष्ठ व्यापारी रतिलालजी कटारीया, नवनाथ दादा कर्डिले, गोकुळशेठ मेहेर, चंपाशेठ राठोड,एम.बी.पवार काका, सुभाषशेठ कटारिया , मोहनशेठ कटारिया, रसिकशेठ श्रीश्रीमाळ,सुरेशशेठ राठोड,व वसंतशेठ चोरबेले यांचे सत्कार करण्यात आले. सत्कार स्वीकारताना सर्वांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी व्यापारी संघटनेचे अध्यक्ष नागेश तात्या कर्डिले,सचिव नितीनशेठ शिंगवी, कोषाध्यक्ष आयुब मोमीन,सल्लागार गणेशशेठ कटारिया, सुनिलराव कर्डिले,प्रकाशशेठ श्रीश्रीमाळ,अमितशेठ राठोड, सय्यद अली,रामशेठ ससाणे, दिपेश गांधी,अक्षय चाणोदिया सदस्य मुन्ना रावळ ,उसमा तांबोळी, वेदांत देशमुख,संजय कर्डिले,संदिपशेठ चाणोदिया, सचिनशेठ गांधी,हनुशेठ ढोबळे, योगेश काठेड, परेश भंडारी, अमोल ढमके,लाभेष नहार, ईश्वर नहार,अकीलभाई, सागर श्रीश्रीमाळ,रोहण गांधी,नितेश गुंदेचा, ललित कटारिया,प्रितम कटारिया

तसेच सरूप स्वीट,जगदंबा स्वीट, राजस्थान स्वीट यांचे मालक उपस्थित होते.यावेळी व्यापारी संघटनेच्या वतीने गोरख तात्या कर्डिले यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.तसेच भाजपा बीड जिल्हा अध्यक्ष शंकर देशमुख यांचाही सत्कार करण्यात आला.येणाऱ्या काळात संघटने मार्फत अजूनही चागले सामाजिक कार्य करण्यात येणार असल्याचे या कार्यक्रमावेळी सांगण्यात आले.


# माजलगावात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खा.श्रीकांत शिंदे यांच्या

## वाढदिवसानिमित्त भगवा सप्ताहाचे आयोजन .येवले,सोळंके,कोंबडे

माजलगाव (प्रतिनिधी)

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते माननीय एकनाथ रावजी शिंदे व खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना सचिव संजय मोरे संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे संपर्क नेते आमदार अर्जुन खोतकर जिल्हाप्रमुख अनिल जगताप युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या आदेशाने माजलगाव येथे दिनांक ४ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी दरम्यान माजलगाव शिवसेना युवासेना महिला आघाडीच्या वतीने भगवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे अशी माहिती शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवासेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख शारदा डोईजड यांनी दिली आहे.





भगवा सप्ताहाची सुरुवात मंगळवार दिनांक ४ फेब्रुवारी रोजी माजलगाव चे ग्रामदैवत सिद्धेश्वर मंदिर येथे महाआरती करून सुरुवात होणार आहे या महाआरतीचे आयोजन युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडी यांनी केले आहे बुधवार दिनांक ५ फेब्रुवारी रोजी माजलगाव शहरातील सर्व मंदिरातील पुजारी यांचा सत्कार व सन्मान या ठिकाणी करण्यात येणार आहे याचे आयोजन रामेश्वर काशीद यांनी केली आहे गुरुवार दिनांक ६ फेब्रुवारी रोजी सुंदरराव सोळंके महाविद्यालय येथे कराटे स्पर्धेचे आयोजन या ठिकाणी विकास शेटे यांनी केलेला आहे शुक्रवार दिनांक ७ फेब्रुवारी रोजी किंग्स डान्स स्टुडिओमध्ये डान्स स्पर्धेचे आयोजन शारदा डोईजड यांनी केलेला आहे शनिवार दिनांक ८ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता दिव्यांग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व फराळ वाटपाचा आयोजन माऊली दादा कदम यांनी केले आहे रविवार दिनांक ९ फेब्रुवारी रोजी शासकीय रुग्णालय माजलगाव येथे जन्मलेल्या नवजात बाळांना बेबी किट व खंडोबा मंदिर येथे महाआरतीचा आयोजन शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी केले आहे सोमवार दिनांक १० फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन मोरेश्वर माध्यमिक विद्यालय शाहूनगर माजलगाव येथे तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांनी केले आहे तरी माजलगाव तालुक्यातील व शहरातील सर्व शिवसैनिकांनी युवा सैनिकांनी भगवा सप्ताहाच्या सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहावे असे आवाहन तालुका प्रमुख तुकाराम येवले व शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी केले आहे.

# शासनाकडून राशन दुकानांवर गहू ऐवजी ज्वारी; शासनाचा हा निर्णय रोजेदारांवर पडणार भारी!


## सणासुदीच्या काळात जनतेला सोसावी लागेल अतिरिक्त आर्थिक झळ - एस.एम.युसूफ़

बीड (प्रतिनिधी)

शासनाकडून या महिन्यापासून राशन दुकानांवर गहू ऐवजी ज्वारी पाठविण्यात येत असल्याने शासनाचा हा निर्णय रोजेदारांवर भारी पडणार असून शासनाला जर राशन कार्ड धारकांना ज्वारी द्यायचीच असेल तर ती गव्हा ऐवजी नको तांदळा ऐवजी देण्याची मागणी होण्याची शक्यता दिसून येत आहे. राशन दुकानावरून गहू बंद केल्यास सर्वसामान्य गोरगरीब जनतेला सणासुदीच्या काळात अतिरिक्त आर्थिक झळ सोसावी लागेल असे मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, शासनाने राशन दुकानांवरून राशन कार्ड धारकांना आता गव्हा ऐवजी ज्वारी देण्याचा निर्णय घेतला असून जिल्ह्यातील राशन दुकानांवर गहू न येता त्या ऐवजी ज्वारी आली आहे. शासनाने घेतलेल्या या निर्णयामुळे सर्वसामान्य गोरगरीब राशन कार्ड धारकांमध्ये मोठ्या प्रमाणात उलट-सुलट चर्चा होऊ लागली आहे. त्यातच इस्लाम धर्माचा रमजान महिना पुढील मार्च महिन्याच्या दोन तारखेपासून सुरू होणार आहे. रमजान महिन्यात मुस्लिम समाजातील महिला, पुरुष, तरुण-तरुणी, आबालवृद्ध सर्वच जण रमजानचे रोजे धरतात. रमजान महिन्यात रोजा असताना





मुस्लिम समाज शक्यतो पहाटे सहरीसाठी तसेच दिवस मावळताना रोजा सोडल्यानंतर जेवणासाठी गव्हाच्या पोळ्यांचाच जास्त उपयोग करतो. मुस्लिम समाजातील रोज़ेदार रमजानच्या महिन्यात ज्वारीची भाकर बनवीत नाही आणि खातही नाही. नेमके याच काळात शासनाकडून राशन दुकानांवर गव्हा ऐवजी ज्वारी पाठविण्यात येत असल्याने मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होऊ लागली आहे. याशिवाय येत्या एप्रिल महिन्यात भारतरत्न संविधान रचयिते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सुद्धा येत आहे. यामुळे फेब्रुवारी ते एप्रिल या तीन महिन्याच्या कालावधीत मोठ्या संख्येने असलेल्या दलित-मुस्लिम समाजाच्या भावना लक्षात घेता शासनाने गहू बंद करून ज्वारी देऊ नये तसेच शासनाकडे जर ज्वारी मोठ्या प्रमाणात शिल्लक असेलच तर शासनाने ती गव्हा ऐवजी न देता तांदळा ऐवजी दिली तर एक वेळ ठीक आहे परंतु असे न करता गव्हा ऐवजी ज्वारी पाठविण्यात येऊ नये. अशी मागणी होण्याची शक्यता आहे.

# गुरुदत्त माध्यमीक व उच्च माध्यमिक विद्यालय, चौसाळा या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



चौसाळा /प्रतिनिधी

गुरुदत्त माध्यमीक व उच्च माध्यमिक विद्यालय, चौसाळा ता.जि.बीड या शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.कार्यक्रमास संस्थापक अध्यक्ष मा.श्री.डॉ.बाबुरावजी,जोगदंड, बालाघाट चे जेष्ठ समाजसेवक मा.श्री.सुग्रीव रसाळ,जेष्ठ पत्रकार.श्री.दादासाहेब मुंडे, देवी बाभुळगाव चे सरपंच मा.श्री.प्रदीपरावजी जोगदंड, संस्थेचे उपाध्यक्ष मा.सयाजी बप्पा शिंदे, कोषाध्यक्ष मा.ड.रामेश्वरजी काशिद साहेब, संस्थेच्या सदस्या पुष्पाताई काशीदमा.नरेंद्र बप्पा जोगदंड, मा.महेश कदम,मा.विलास घरत,चौसाळ्याचे मा.सरपंच मधुकरमामा तोडकर . शालेय समिती सदस्य संभाजी (आबा) जोगदंड. चेअरमन उमेश राव ग्रामपंचायत सदस्य अमर जोगदंड, गणेश बापू जोगदंड, शालेय समिती सदस्य उमेश राव आंधळे ,चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक (बाबा) कुचेकर, पंडितराव जोगदंड मा.मिराज मुलानी,अजमेर मनियार यांच्यासह संस्थेचे सर्व सन्माननीय संचालक, गावातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी,पालक उपस्थित होते.


कार्यक्रम चे उद्घाटन मा.डॉ.बाबुरावजीजोगदंड व मा.सुग्रीव रसाळ यांच्या शुभ हास्ते दिप प्रज्वलन व श्रीफळ फोडून करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी जेष्ठ पत्रकार दादासाहेब मुंडे यांनी ग्रामीण भागातून विद्यार्थ्यांना रंगमंच उपलब्ध करून देऊन त्यांच्या कलागुणांना वाव देण्याबद्दल धन्यता व्यक्त केली व विद्यार्थ्यांना देश धर्म व संस्कृतीचे जोपासना करण्याचे आवाहन केले. तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर बाबुरावजी जोगदंड यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षातून यश संपादन करावे व शाळेच्या नावलौकिक व कीर्ती विद्यार्थ्यांनी वाढवावी असे आवाहन केले. शिक्षणातून साक्षर राक्षस निर्माण न होता संस्कारक्षम नागरिक तयार झाले पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त केली. व लवकरच शाळेचे भव्य दिव्य इमारतीत प्रस्थान होईल अशी ग्वाही दिली .स्नेहसंमेलनात शाळेतील मुलांनी व मुलींनी विविध चालु घडामोडींवर बतावण्या सादर करून प्रेक्षकांची मने जिंकून देशभक्तीपर गीत,भजन,गवळण, लोकगीत, आसा विविध गुणदर्शनचा बहारदार कार्यक्रम सादर केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय शिक्षण समिती सदस्य मा.श्री.संभाजी आबा जोगदंड यांनी अथक परिश्रम घेतले. मा.मुख्याध्यापक श्री.चौधरी सर यांनी आपल्या प्रस्ताविकातून. विद्यालयाच्या प्रगतीचा आलेख उपस्थितांसमोर मांडला व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे अभिवचन उपस्थित पालकांना दिले. कार्यक्रम उत्कृष्ट व दर्जेदार करण्यासाठी .केदार सर, साबणे मॅडम, घोडके सर, ,वैध सर, गुरव सर, जाधव सर, लिमकर सर, टाचतोडे बाई, सोनवणे नाना,विश्वनाथ पवार, धनंजय वाघमारे.इ.परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्री.राठोड सर व गुरव सर यांनी आपल्या ढंगदार शैलीनेकेले. तर आभार श्री मोठे सर यांनी केले साऊंड सिस्टिम उत्कृष्ट नियोजन मा.श्री.केदार सर यांनी केले.शेवटी पसायदान घेऊन कार्यक्रम संपवण्यात आला.

# वारोळा तांड्यातील ऊसतोडणी कामगार पती-पत्नी मयतांच्या नातेवाईकांना शासनाने तात्काळ आर्थिक मदत करावी - बी. एम. पवार

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील वारोळा तांडा येथील बंजारा समाज बांधव सोलापूर जिल्ह्यातील लोकनेते सहकारी साखर कारखाना येथे काम करून परत येत असताना करंजी घाटात ट्रॅक्टर पलटी झाला असून यात अनिल आणि आरती हे पती पत्नी जागीच ठार झाले असून मयतांच्या नातेवाईकांना राज्य शासनाने पन्नास लाख रुपयांची आर्थिक मदत तात्काळ करावी अशी मागणी सेवालाल सेना संस्थापक /अध्यक्ष बी. एम. पवार यांनी केली आहे.



मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, कुटुंबातील लहान - लहान लेकरांच्या व आपल्या पोटाच्या उदरनिर्वाह करण्यासाठी बंजारा समाज बांधव हा ऊसतोडणी मजूर म्हणून राज्यात व परराज्यात जात असतो अशाचप्रकारे माजलगाव तालुक्यातील वारोळा तांड्यातील बंजारा बांधव लोकनेते सहकारी साखर कारखाना तालुका मोहोळ जिल्हा सोलापूर या कारखान्याला ऊसतोडणी मजूर म्हणून गेले होते. ऊसतोडणीचे काम संपल्यानंतर आपल्या गावी परत येत असताना रात्री दोन च्या सुमारास करंजी अपघात झाला आणि या अपघातात अनिल पिराजी राठोड (२७) आरती अनिल राठोड (२५) हे पती पत्नी जागीच ठार असुन रंजना प्रकाश पवार ही भगिनी गंभीर जखमी झाली आहे. टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठी ऊसतोडणीला गेलेल्या राठोड कुटुंबांवर काळाने घाला घातला असून या घटनेमुळे बीड जिल्ह्यातील बंजारा समाजात शोककळा पसरली आहे. मयत अनिल आणि आरती यांच्या निधनामुळे त्यांचे लहान लहान चिमुरडी मुलं उघड्यावर पडली असून राज्य सरकारने तातडीने या कुटुंबीयांना आर्थिक मदत करावी अशी मागणी बी. एम. पवार यांनी केली आहे.

## आ. सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन,क्रिकेट प्रेमिंनी लाभ घ्यावा- चेअरमन संजय गाढवे

आष्टी प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील धामणगांव जिल्हा परिषद गटात आमदार सुरेश धस यांच्या वाढदिसा निमित्त दर वर्षी आष्टी दूध संघांचे चेअरमन संजय गाढवे यांच्या पुढाकारातून विविध सामाजिक उपक्रमाचे व क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येते,याही वर्षी देखील २फेब्रुवारी आमदार सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त चेअरमन संजय गाढवे यांच्या पुढाकारातून आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता धामणगाव ता आष्टी येथे आ. सुरेश धस याच्या हस्ते करण्यात येणार आहे,या स्पर्धेमध्ये प्रथम विजेत्या संघाला रोख ३१००० हजार तर द्वितीय विजेत्या संघाला २१०००,त्रितिय विजेत्या संघाला १५०००व चतुर्थ ११००० व पाचवे ७७७७ असे भरघोस बक्षिसे ठेवण्यात आले आहे, त्या सोबत आणखीन विविध बक्षिसे देखील ठेवण्यात आले आहे तरी या आमदार चषक क्रिकेट स्पर्धेत तालुक्यातील गावाच्या क्रिकेट संघाने सहभागी व्हावे असे आवाहन आष्टी दुध संघांचे चेअरमन संजय गाढवे यांनी केले आहे.



## गणपती नगर येथे हरिनाम सप्ताह

बीड: शहरातील जुन्या सरस्वती शाळेमागे, सर्कस ग्राऊंड येथील बेलेश्वर मंदिराच्या नजीक असलेल्या गणपती नगर येथे २ ते ९ फेब्रुवारी दरम्यान अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या कालावधीत पहाटे काकडा आरती, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, प्रवचन व नामांकित हभप यांचे अमृततुल्य कीर्तन दररोज रात्री ८ ते १० या वेळेत होणार आहे. हभप शारदाताई मापारी यांचे रविवारी कीर्तन होणार आहे, हभप सोनालीताई करपे यांचे सोमवारी, हभप रुपालीताई सवणे यांचे मंगळवारी, नेकनूर बंकटस्वामी संस्थानाचे मठाधिपती हभप लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे बुधवारी, नारायणगड संस्थानाचे मठाधिपती हभप शिवाजी महाराज यांचे गुरुवारी, हभप बाळू महाराज गिरगावकर यांचे शुक्रवारी, हभप केशव महाराज उखळीकर यांचे शनिवारी तर लोळदगाव दत्त संस्थानाचे मठाधिपती हभप वसंत महाराज यांचे काल्याचे कीर्तन रविवारी होणार आहे. काल्याचे कीर्तन संपन्न झाल्यावर महापंगत होणार आहे. या सप्ताहात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# गेवराई येथील शिवारोग्य आय टी आय यांने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिली- अतूल केसकर

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : शिवारोग्य आय टी आय कॉलेज हे विद्यार्थी घडविण्याचे चांगले कार्य करत असून यामुळे बाहेर पडणारे विद्यार्थी हे पुढील काळात नक्कीच चांगल्या ठिकाणी कामाला लागल्या शिवाय राहणार नाहीत शिवाय मोठ्या शहराच्या ठिकाणी लाखो रुपये खर्च करून मिळणारे शिक्षण विद्यार्थीना गेवराई शहरात कमी खर्च होत असल्याने विद्यार्थ्यांना ही यामुळे चांगला प्ल्यूट फॉर्म मिळाला असल्याचे प्रतिपादन सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, छ. संभाजीनगर चे अतुल केसकर यांनी केले.

गेवराई शहारातील ताकडगाव रोड या ठिकाणी सुरु करण्यात आलेले शिवारोग्य आय टी आय येथे शुक्रवार दि.३१ रोजी प्रकल्प प्रदर्शन स्पर्धा-२०२५ आयोजित करण्यात आले होती. यावेळी केसकर बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलानी झाली. प्रकल्प प्रदर्शन स्पर्धा कार्यक्रमाला लाभलेल्या प्रमुख पाहुणे व अध्यक्षयांनी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रा विषया माहिती दिली. त्यानंतर स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या स्पर्धकांना बक्षीस व प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी अतुल केसकर (सहाय्यक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, छ. संभाजीनगर), मोरे शाम (उपकार्यकारी अभियंता, म.रा. वि. विभाग, गेवराई), राहुल लिंगसे (शाखा व्यवस्थापक, महा.ग्रा. बँक, गेवराई), दिलीप पवार (प्राचार्य, जगदंबा खा.औ.प्र. संस्था, गेवराई), मधुकर तौर (अध्यक्ष गेवराई तालुका पत्रकार संघ ), ज्ञानेश्वर बानाईत (प्राचार्य शिवारोग्य खा.औ.प्र. संस्था, गेवराई) आदींची उपस्थिती होती.



यावेळी पुढे बोलताना केसकर म्हणाले की, शिवारोग्य आय टी आय कॉलेज हे गेवराई शहारात प्रथमच सुरू झाल्यामुळे येथील विद्यार्थी एक प्रकारे व्यावसायीक दालनच निर्माण झाले आहे. या ठिकाणी काम करणारा कर्मचारी वृंद हा अभ्यासू व हुशार असून आपल्या कडील ज्ञान हे विद्यार्थ्यांना देण्यासाठी प्रयत्नशिल असल्याचे त्यांनी सांगितले व या ठिकाणी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एक प्रकारे शिक्षणाची चांगली संधी उपलब्ध करून दिल्या बद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यांचे आभार व्यक्त केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कर्मचारी नाईक महेश, संत बाबू, सय्यद मुज्तबा अहेमद, अंकुश काळे, परमेश्वर बानाईत, श्री. पठाण परवेज, सौ. शेमे आरती, सौ. शिंदे जयश्री, सौ. सौजी मॅडम आदींनी सहकार्य केले.

# भारतीय संविधान पूजेचा नाही तर अंमल करण्याचा ग्रंथ आहे - बनसोडे पी.व्ही.

## महामानव सार्वजनिक वाचनालया तर्फे मूकनायक दिन संपन्न

बीड (प्रतिनिधी)

आपल्या देशात वर्ण व्यवस्थेने निर्माण केलेल्या समाज व्यवस्थेत धार्मिक,सांस्कृतिक, शैक्षणिक व आर्थिक गुलाम गिरीत पिचत पडलेल्या दीन दलित वंचित समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचारची फोडण्याकरता व त्यांचे दुःख काय आहे हे सर्वांना समजण्याकरता १०५ ची वर्षापूर्वी मूकनायक या पाक्षिकाचा प्रारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला होता.तो दिन सध्याच्या प्रसार माध्यमांना मोलाचे मार्गदर्शक ठरला आहे. इंग्रजांच्या दीडशे वर्षांच्या गुलामगिरीतून मुक्त झालेल्या स्वतंत्र भारताकरता जगातील सर्वश्रेष्ठ संविधान निर्माण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विज्ञानवादी दृष्टिकोनाचे व प्रज्ञा, शील, मैत्री हे मानवा मानवातील विषमता नष्ट करण्याचे साधन म्हणजे भारतीय संविधान होय. या संविधानाचे सार म्हणजे संविधानाची प्रस्ताविका होय. भारतीय संविधान पूजेचा अंमल करण्याचा ग्रंथ आहे. असे उद्गार अध्यक्षपदी लाभलेले बनसोडे पी.व्ही. यांनी केले.



महमानव सार्वजनिक वाचनालय धानोरा रोड बीड येथे वाचनालयाने मूकनायक दिन समारंभ आयोजित प्रसंगी संपादक दैनिक समर्थ राजयोग तथा प्रदेश संपर्कप्रमुख महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे वैभव स्वामी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर बीड अक्षरधामचे संपादक बालाजी जगतकर, संपादक बालाजी तोंडे, दैनिक लोकमतचे प्रतिनिधी आकाश सावंत, संतोष राजपूत आणि सेवानिवृत्त पी.आय. यु. एस.पारवे, सेवा निवृत्ती इंजिनिअर भिमज्ञ वेडे यांची मंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाला वाचनालयाचे अध्यक्ष कॅप्टन राजाभाऊ आठवले व सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक एल.आय.सी. यु. एस. वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते, महापुरुषांच्या प्रतिमेचे पुष्पहार व पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जी.एम.भोले यांनी करून महामानव सार्वजनिक वाचनालय, ग्रुप महामानव अभिवादन ग्रुप वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालय राबवित असलेल्या समाज उपयोगी कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत वासनिक यांनी केले. प्रमुख पाहुणे संपादक वैभव स्वामी यांनी मनोगतामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेळची म्हणजेच १९२० च्या वेळची पत्रकारिता व सध्याच्या काळातील पत्रकारिता याबद्दल सखोल विवेचन केले. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेचा आदर्श पत्रकारिते मध्ये सर्वांच्या डोळ्यासमोर राहावा म्हणून ३१ जानेवारी हा दोन मुकनायक दीन म्हणून संपूर्ण पत्रकार संघातुन, शाळा व महाविद्यालयातून, शासन स्तरावर संपन्न होणे गरजेचे आहे. त्याकरिता शासनाकडे पाठपुरावा केल्या जाईल व पुढील वर्षाचा मूकनायक दिन बीड जिल्हा पत्रकार संघाचा सहभाग नोंदवून व्यापक स्वरूपात संपन्न केला जाईल असे ठोस आश्वासन दिले. या . प्रसंगी बालाजी जगतकर, बालाजी तोंडे, आकाश सावंत संतोष राजपूत, पी आय पारवे,ईजि. भिमज्ञ वेडे यांनी पत्रकारितेचे महत्व व सध्या परिस्थितीबद्दल सखोल विवेचन केले. या कार्यक्रमास सुजाता वासने, रेश्मा विद्याघर, राजू भोले, सोनवणे, रमेश माटे . माजी सैनिक पंडित चक्रे, पीएसआय . रामदेव शिनगारे, प्रा. अशोक गायकवाड,अँड.तेजस वडमारे, विद्याघर नाना, काशिनाथ वाघमारे, अर्जुन जवंजाळ व वाचनालयाचे, बहुसंख्य सदस्य, नागरिकांची उपस्थिती होती. भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामुदायिक वाचनाने कार्यक्रमाची सांगता झाली.




# सखुबाई दिगंबर कस्बे यांना लोकसहभागातून मिळालं हक्काचं घर,

## डोळ्यातून आले आनंदाश्रू.मान्यवरांच्या हस्ते फित कापून झाला गृह प्रवेश

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

शहरातील समतानगर भागातील सखुबाई दिगंबर कस्बे नाल्याच्या बाजुस मातीच्या भेंड्या पासुन बनवण्यात आलेल्या विटा पासुन लहाने घर होते,मात्र ते पावसामुळे भिजून गेल्यामुळे पूर्ण भिंत ओली असल्यामुळे पडझड झाली होती पूर्ण पत्रे गळके होते पावसाळ्यात नाल्याला पाणी आले की पूर्ण घाण पाणी घरात शिरले जातात आणि राहण्यास शिल्लक जागाच नसत , पावसाळ्यामध्ये सखुबाई शेजाऱ्या बाजारी घराच्या बाहेर आसरा घेत असे. कोणी आसरा देत तर कोणी देत नसे. सखुबाईला मुलगा मुलगी होती मात्र त्यांचे निधन झाले, तसेच पतीचेही तीन-चार वर्षांपूर्वी निधन झाल्यामुळे सखुबाई वर दुःखाचा डोंगर कोसळला कारण पाहणारे कोणीही नाही. खंडीभर नातेवाईक आहे पण कोण पाहणार मानवलोक कडून गेल्या आठ वर्षापासून किराणा सामान दिल जाते त्याच्यावरच आपले गुजरान करत असे, निराधारचे अनुदान मिळत आहे त्यामधून औषध गोळ्या पाणी व इतर खर्च करत. सखुबाईला वाटू लागली की खायला आहे, मात्र राहण्यास घर नाही त्यामुळे सखुबाई पावसाळ्यात सैरावैरा पळत असे. मानवलोक संस्थेकडे संपर्क केला आणि म्हणाल्या की, एक-दोन पत्राचं घर द्या एवढाच आशेचा किरण आहे.

आणि असे ठरवले की आपण लोक सहभागातून एक लहानसा घर देता येईल का त्यामुळे अनेकांशी चर्चा केली आणि एक लहानस घर बांधून देण्याचे ठरले अनेकांनी यासाठी अर्थसहाय्य केले, अनेकांनी विटा, पत्रे, सिमेंट, घराचे खिडकी, डस्ट , मुरूम, अशा प्रकारे सहाय्य केले आणि एक छानसे टुमदार घर बांधून देण्यात आले. सखुबाईच्या घरी अनेक मान्यवर आले आणि सखुबाईनी डोळ्यातील आनंदाश्रूला वाट मोकळी करून दिली, त्या म्हणाले की मी आजवर कोठे आडोसा घेऊन रात्र काढत असे मला जवळ कोणीही केले नाही पण आज घर झाल्यामुळे अनेक नातेवाईक अस्थिवाइकपणे विचारत आहेत. घर झाल्यामुळे आता मला कुठे जायचे गरज नाही ऊन पाऊस वारा आला तरी मला काहीतरी नाही. या लोकार्पण सोहळ्यासाठी, नंदकिशोर मुंदडा, मानवलोकचे अनिकेत लोहिया, डॉ, संदीप थोरात, डॉ, हर्षमाला काळे, संतोष लोमटे, स्वेक्षा लोहिया, सचीन डोंगरे, सुभाष ताटे, संजय साळवे, नरसिंग साबणे, दादासाहेब कस्बे, परमेश्वर गीते, बबन मारवाड,अनिल बनसोडे, संतोष चव्हाण, बालाजी शेरेकर आदी उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT